तरुण भारत संवाद
गुरूवार १५ फेब्रुवारी २०२४

# आंतरविद्यापीठ नेमबाजीत विद्यापीठ संघाची उत्कृष्ट कामगिरी

■ आसाममध्ये २१ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटीलने (विवेकानंद कॉलेज) १० मीटर एअर रायफल या प्रकारामध्ये कांस्यपदक मिळवले. हे पदक आपल्या नावावर करण्यासाठी ज्ञानेश्वरीने ६५४ पैकी ६३०.३ गुणांची कमाई केली. याचबरोबर पुरुष–महिला मिक्स गटातून स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल्या फिझा देसाई (छत्रपती शहाजी कॉलेज) व श्रेयस उपाध्ये (के. डब्ल्यू एस. कॉलेज, सांगली) यांच्या जोडीनेही १० मीटर पिस्तल प्रकारात ६०० पैकी ५७२ गुण मिळवत कांस्य पदक पटकावले. या पदकाला गवसणी घालण्यासाठी फिझाने ३०० पैकी २८४ तर श्रेयस उपाध्ये (३०० पैकी २८८ गुण मिळवले.

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथील कुरुक्षेत्र विद्यापीठातील शुटींग रेंजवर ही स्पर्धा झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघासह देशातील ७२ विद्यापीठ संघांमधून ३२३ नेमबाजांनी प्रतिनिधीत्व केले. या स्पर्धेच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या आदित्य साळुंखे (कॉमर्स कॉलेज), सुमेध सासने, प्रतीक जोंग (दोघेही लहू बाळा परित्रेकर महाविद्यालय, पनोरे, ता. पन्हाळा) या तिघांच्या संघाने पाचवा क्रमांक मिळवला. तसेच ज्ञानेश्वरी पाटील, ऐश्वर्या पोवार व गौरी कांबळे (विवेकानंद कॉलेज) या तिघींच्या संघानेही १० मीटर एअर रायफल प्रकारात पाचवा क्रमांक पटकावला. स्पर्धेतील वरील सर्वच यशस्वी नेमबाजांची २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान गुवाहाटी (आसाम) येथे होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड केली आहे.

निवड झालेल्या नेमबाजांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागाचे क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्यासह संघ प्रशिक्षक डॉ. निलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय) व संघ व्यवस्थापक डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

15/02/24

15/2/24